MHRG190000182025

**:: <u>दिवाणी चौकशी अर्ज क्र.८/२०२५ मधील निशाणी क्रमांक १३ खालील आदेश</u> ::**

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.२ यांनी 'विना म्हणणे' आदेश रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. सामनेवाला क्र.२ चे कथन की, नेमलेल्या तारखेस अर्जाचे कामी आवयक असणारी महत्वाची माहिती व कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. सबब, न्यायालयाने विना म्हणणे आदेश पारीत केला आहे. सामनेवाला यांचे म्हणणे दाखल होणे अंतिम न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. करिता सदरचा विना म्हणणे आदेश रद्द होऊन म्हणणे देणेस परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जदारतर्फे वकीलांनी सदर अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे.

०५. अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा अर्ज दिर्घ ठेवीमध्ये गुंतविलेली रक्कम परत मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.२ विरुध्द प्रकरण विना म्हणणे चालविण्याचा झालेला आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदारचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणदोषावर निकाली निघेल व उभय

पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सामनेवाला यांनी अर्जातील दिलेली कारणे उचित व संयुक्तिक आहेत. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.२ विरुध्द दिनांक ३०.१०.२०२५ रोजी पारित झालेला विना म्हणणे आदेश रद्द करण्यात येतो व अर्जास म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.29 16:20:54 +0530

महाड (**एच. आर. जाधव**)

दिनांकः२९.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, महाड